**<u>प्रतिवादींतर्फे साक्षीदाराचा पुढील उलटतपास विद्वान विधीज्ञ श्री. एस. डी. अतकिरे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः-</u>**

१७. हे म्हणणे खरे आहे की, बाळकृष्ण आबु गोडसे हे माझे वडील आणि लक्ष्मीबाई बाळकृष्ण गोडसे या माझ्या आई आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई लक्ष्मीबाई यांनी या प्रतिवादींविरुध्द दुसरा नि.दि.दा.क्र.२६४/२०११ दाखल केलेला आहे. माझे वडील गेली ५० वर्षांपासुन टाकळी येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, आमची वडीलोपार्जीत मिळकत टाकळी गावात नाही. माझे लग्न १९८८ साली झाले आहे. माझ्या पतीचे नाव दिलीप हरिभाऊ मगर असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, १९९६ साली दस्त करतेवेळी मी माझ्या सासरी नांदत होते. साक्षीदार म्हणते की, मी टाकळी गावात होते. माझे सासर लोणीकंद, ता. हवेली, जि. पुणे येथे आहे. माझे पती एम.एस.ई.बी. मध्ये आमच्या लग्नाच्या आधीपासुन नोकरी करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीच्या पगारावर आमचा घरखर्च चालत असे. साक्षीदार म्हणते की, एकत्र कुटूंब असल्यामुळे सगळ्यांचा एकत्रात खर्च होत होता. हे म्हणणे खरे नाही की, १९९६ साली मी काही कामधंदा करीत नव्हते. साक्षीदार म्हणते की, मी शिवणकाम करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, शिवणकाम करीत असल्याबाबतचे कागदपत्र मी दाखल केलेले नाही.

१८. दावा मिळकत गट क्र.३५ चे एकुण क्षेत्र अंदाजे १८ हेक्टर असल्याचे मला आता आठवत आहे. सन १९९६ साली साठेखत करतेवेळी मी मिळकतीचा ७/१२ पाहिलेला होता. प्रतिवादींना मी लहानपणापासुन ओळखते. हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ पत्रकी आणेवारीप्रमाणे क्षेत्रावर प्रतिवादींच्या नावाची नोंद झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर ७/१२ ला प्रतिवादींसोबत इतर हिस्सेदारांच्या नावाची नोंद देखील आणेवारीप्रमाणे झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, साठेखतात नमुद क्षेत्र १ हेक्टर २० आर असे ७/१२ पत्रकी प्रतिवादींच्या नावापुढे नमुद नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, साठेखतात नमुद चतुःसिमा दाखविणारा तलाठ्याचा दाखला किंवा इतर कागदोपत्री पुरावा मी या केसकामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, साठेखतात नमुद चतुःसिमा या संपुर्ण गट क्र.३५ च्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही प्रतिवादींची वडीलोपार्जीत मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत वडीलोपार्जीत असल्यामुळे सर्व वारसांचा त्यामध्ये हिस्सा आहे. साक्षीदार म्हणते की, वडीलांनी एकत्र कुटूंबाकरीता सर्व वारसांच्या वतीने विक्री केली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रभु भिवा ठाकर हे दि.०४.०१.२०१९ रोजी मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, प्रभु भिवा ठाकर यांना दत्तात्रय, किसन, भाऊसाहेब अशी तीन मुले आहेत व बायडाबाई बाळु कोकरे ही मुलगी आणि सरस्वती पत्नी आहे. साठेखत केले त्यावेळी प्रभु यांची तीन मुले सज्ञान होती अगर कसे हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रभु यांची मुले साठेखतावेळी शिक्षण घेत होते. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही भोगवटादार वर्ग-२ ची असल्यामुळे त्या दिवशी खरेदीखत करता आले नाही.

१९. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींना लिहीता–वाचता येत नव्हते, ते अंगठा करत होते. हे म्हणणे खरे आहे की, १९९६ च्या साठेखताला प्रतिवादींच्या वारसांची संमती घेतलेली नाही. वादातील साठेखतावर र.रु.५,३८०/– चा स्टॅम्प लावलेला होता. साक्षीदार पुन्हा म्हणते की, दावा दाखल करतेवेळी र.रु.५,३८०/– चा स्टॅम्प लावला होता. साठेखतावर किती स्टॅम्प दिला हे मला आता नक्की आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, साठेखतासाठी लागणारा स्टॅम्प माझ्या वडीलांनी विकत घेतला होता. साठेखतावर साक्षीदार म्हणुन आनंदराव मुरकुटे आणि बबनराव नरसाळे होते. साठेखतावर मी, प्रतिवादी आणि साक्षीदारांनी एकुण किती सह्या व अंगठे केले हे मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, साठेखतात नमुद माहिती माझ्या वडीलांनी सांगितली होती. साक्षीदार म्हणते की, माहिती प्रतिवादींनी सांगितली होती. हे म्हणणे खरे आहे की, साठेखत करतेवेळी र.रु.६५,०००/– माझ्याकडे होते असा दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी या केसकामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींचे आजपर्यंत आपसात वाटप झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, साठेखत करतेवेळी पुनर्वसन खात्याची परवानगी लागणार होती हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, १९९६ ते २०११ च्या दरम्यान खरेदीखत करुन द्या अशी नोटीस प्रतिवादींना पाठविलेली नव्हती. साक्षीदार म्हणते की, वारंवार तोंडी विनंती करुन देखील प्रतिवादींनी खरेदीखत करुन दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींनी पाठविलेल्या नोटीस उत्तरामध्ये खरेदीखत करुन देणार नाही असे सांगितलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींना त्यांचे क्षेत्र बागायत करायचे होते म्हणुन त्यांनी माझ्या वडीलांकडुन र.रु.२०,०००/– हातउसणे घेतले होते आणि तारण म्हणुन वादातील साठेखत करण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, र.रु.२०,०००/– परत दिल्यानंतर तो दस्त फाडुन टाकायचा असे ठरले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे र.रु.२०,०००/– प्रतिवादींनी आम्हाला दोन वर्षांत परत अदा केले होते. हे म्हणणे खरे नाही की, र.रु.२०,०००/– परतफेड करतेवेळी प्रतिवादी क्र.२अ दत्तात्रय तेथे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरची रक्कम परतफेड केल्यामुळे सन १९९६ ते २०११ पर्यंत मी प्रतिवादींविरुध्द कोणतीही कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोकळीस्त साठेखताच्या आधारे प्रतिवादींची जमीन लुबाडण्याकरीता मी खोटा दावा दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः– १२.०८.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दौंड.

नि.दि.दा.क्र.२६२/२०११
(नि.७४ लगत)

मिनाक्षी वि. गोपा व इतर

**<u>वादीतर्फे सा.क्र.१ चा पुढील सरतपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एम. एस. जांभुळकर यांच्यातर्फे शपथेवर सुरुः–</u>**

९. मी नि.३ यादीलगत एकुण ३ कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अ.क्र.१ अन्वये गांव मौजे पाटस, ता. दौंड येथील गट क्र.११२/१० चा नमुना ८अ, अ.क्र.२ अन्वये गांव मौजे पाटस, ता. दौंड, जि. पुणे येथील गट क्र.११२/१० चा ७/१२ उतारा व अ.क्र.३ अन्वये गांव मौजे पाटस, ता. दौंड, जि. पुणे चा फेरफार क्र.६६७५ यांच्या प्रमाणित प्रती दाखल केलेल्या आहे. त्या त्याच आहेत. त्यांना अनुक्रमे **<u>नि.३४ ते ३६</u>** देण्यात येतात.

**<u>कागदपत्रे दाखल करणेकामी पुढील मुदत मिळावी अशी वादीच्या विद्वान विधीज्ञांनी तोंडी विनंती केली. त्यामुळे सदर साक्षीदाराचा पुढील सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत

[ **श्रीमती जे.एस.खेडकर–गोयल** ]
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दौंड,
ता. दौंड, जि. पुणे.

दिनांकः– ०२.०२.२०२४

**<u>वादीतर्फे सा.क्र.१ चा पुढील सरतपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एम. एस. जांभुळकर यांच्यातर्फे पुन्हा शपथेवर सुरुः–</u>**

१०. मी आज रोजी नि.३८ यादीलगत हारुबाई आण्णा भंडलकर यांचा मृत्युचा दाखला प्रमाणित प्रत दाखल केलेला आहे. आता मला दाखविलेला दाखला हा तोच आहे. त्यास **<u>नि.३९</u>** देण्यात येते. तरी प्रार्थणेप्रमाणे दावा मंजुर व्हावा.

**<u>पुढील सरतपास पुर्ण.</u>**

**<u>प्रतिवादी क्र.१, ६ व ७ यांच्याविरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश दि.१५.०३.२०२२ रोजी झालेला असुन त्यानंतर ते आजपावेतो दाव्यात हजर झालेले नाही. तसेच प्रतिवादी क्र.३ विरुध्द विनाकैफियतीचा आदेश दि.०२.०२.२०२३ रोजी झालेला आहे. प्रतिवादी क्र.२ मयत आहे. तसेच प्रतिवादी क्र.४ व ५ हे अज्ञान असुन त्यांचे गार्डीयन म्हणुन अ.पा.क. म्हणजे प्रतिवादी क्र.३ यांची नियुक्ती नि.२२ वरील आदेशानुसार झालेली आहे. प्रतिवादी क्र.४ व ५ तर्फे अ.पा.क. म्हणुन प्रतिवादी क्र.३ यांनी नि.३१ वरील पुरसीसनुसार वादीचा दावा मान्य व कबुल केलेला आहे. तसेच प्रतिवादींनी त्यांना त्यांचा हिस्सा कायद्याप्रमाणे मिळावा असे नमुद केलेले आहे. वर नमुद कारणास्तव सदर साक्षीदाराचा प्रतिवादींतर्फे उलटतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत

[ **श्रीमती जे.एस.खेडकर–गोयल** ]
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दौंड, जि. पुणे.

दिनांकः– १९.०३.२०२४